**<u>रे.मु.नं.३४/२०१७</u>**

देवू वि. बापू

नि.क्र. ४२ लगत

वादीतर्फे सा.क्र.०१

**<u>अतिरीक्त सरतपास –</u>**

०९. शपथेवर सांगतो की, मी माझे पुराव्याचे प्रतिज्ञापत्र दाखल केले असून त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे. त्यावर माझी सही आहे.

१०. माझ्या वडिलांच्या निधनानंतर आईला निवृत्ती वेतन मिळत होते. सदर निवृत्ती वेतनाची रक्कम ही पोस्टाने येत होती. त्याबाबत आईकडे पोस्टाच्या पावत्या आहेत. आता दाखवलेल्या दस्तयादी नि.क्र.५२ सोबत असलेले एकूण १६ पोस्टाच्या पावत्या या त्याच आहेत. सदर पावत्या आईच्या ताब्यात होत्या. काही काळानंतर निवृत्ती वेतन हे बँकेमार्फत आईला मिळत होते. आईचे कुर्ला नागरी बँक, शाखा कुर्ला येथे खाते होते. सदर खात्याचे मी पासबुक हजर केले आहे. आईच्या निधनानंतर आईची संदुक उघडली त्यात मला वरील पावत्या व पासबुक मिळून आल्या. सदर पावत्या व पासबुकमधील मजकूर खरा व बरोबर आहे.

**<u>प्रतिवादी क्र.०६ ते ०८ तर्फे उलटतपास विधिज्ञ श्री.ए.एम.माणगावकर यांनी नाकारला.</u>**

**<u>प्रतिवादी क्र.०१ ते ०५ तर्फे उलटतपास विधिज्ञ श्री.बी.एम.दळवी यांचेतर्फे –</u>**

११. माझे शिक्षण अकरावी पर्यंत झाले आहे. सातवी पर्यंत शिक्षण माझे गावी व नंतरचे शिक्षण मुंबई येथे झाले आहे. माझी जन्मतारीख दि.०८/११/१९४६ आहे. वयाच्या सहा–सातव्या वर्षी मला समज आली, म्हणजेच मला १९५४–५५ मध्ये समज आली. हे म्हणणे खरे आहे की, मी सध्या मोंड गावी ग्रामपंचायत घर क्र.५५४ मध्ये राहतो. हे माझ्या लक्षात नाही की, वरील घर हे सर्वे क्र.३/१६ या मिळकतीमध्ये आहे किंवा नाही. हे म्हणणे खरे आहे की, सदर घर हे माझे वडिल घारु यांनी बांधले होते. हे म्हणणे खरे आहे की, वडिलांच्या निधनानंतर वरील घर मिळकती माझ्या व बापु यांच्या नावे झाल्या. वडिल घर क्र.५५४ मध्ये सन १९५७ मध्ये मरण पावले. माझ्या आईचे निधन सन २००८ मध्ये झाले. हे म्हणणे खरे आहे की, मयत प्रतिवादी बापू यांचा जन्म १९२४ मध्ये झाला होता. हे म्हणणे खरे आहे की, वडिलांचे दुसरे लग्न अंदाजे सन १९३९ मध्ये झाले होते.

१२. हे म्हणणे खरे आहे की, घर क्र.५५४ चे विभाजन होऊन घर क्र.५५४अ व ब असे नवीन क्रमांक देण्यात आले आहे. हे म्हणणे खरे आहे की, मयत प्रतिवादी बापू यांनी सन १९८५ मध्ये दावा मिळकतीमध्ये घराचे बांधकाम केले. आज रोजी प्रतिवादी क्र.०१ ते ०५ हे सदर घरात राहतात. हे म्हणणे खरे नाही की, मयत प्रतिवादी बापू यांनी दावा मिळकतीमध्ये आंबा, माड अशा झाडांची लागवड केली व सदर झाडांचे उत्पन्न प्रतिवादी क्र.०१ ते ०५ हे घेतात. हे म्हणणे खरे आहे की, वादांकित

दि.०२/०१/१९४५ रोजीचे खरेदीखत माझ्या जन्मापुर्वी नोंदवले आहे व त्यामुळे मला सदर खरेदीखताबाबत वैयक्तिक माहिती नाही. नि.क्र.५३ वरील खरेदीखत मी पाहिले आहे. सदर खरेदीखत हे बापू यांच्या नावे नोंदवलेले आहे. हे म्हणणे खरे आहे की, सदर खरेदीखत नोंदवतेवेळी बापू यांचे वय २१ वर्षे होते. नि.क्र.५३ वरील खरेदीखतातील संपूर्ण मजकूर मी वाचलेला नाही. हे म्हणणे खरे आहे की, कृष्णाजी कुळकर्णी यांनी खरेदीखतानुसार मिळकतीचा कब्जा बापू यांना दिला होता. हे म्हणणे खरे नाही की, नि.क्र.५३ वरील खरेदखतात नमुद मोबदल्याची रक्कम बापू यांनी कृष्णाजी कुळकर्णी यांना दिली होती. हे म्हणणे खरे आहे की, नि.क्र.५३ वरील खरेदीखतामध्ये खरेदीखताची रक्कम बापू व्यतिरीक्त इतर कोणी दिली याबाबत उल्लेख नाही. हे म्हणणे खरे आहे की, नि.क्र.५३ वरील खरेदीखतामध्ये कृष्णाजी कुळकर्णी यांनी सदर मिळकत बापू सारंग व्यतिरीक्त इतर कोणाला विक्री केली याबाबत उल्लेख नाही. हे म्हणणे खरे आहे की, नि.क्र.५३ वरील खरेदीखतामध्ये घारु यांच्या पैशातून कुटुंबाकरीता बापुच्या नावे मिळकत खरेदी केल्याचा उल्लेख नाही. हे म्हणणे खरे आहे की, खरेदीखतानुसार बापु यांच्या नावाची नोंद महसुल दप्तरी फेरफार क्र.९८२ अन्वये झाली होती. हे मला माहिती नाही की, सदर नोंद सन १९४५ मध्ये झाली होती किंवा नाही. हे म्हणणे खरे आहे की, सदर नोंद आजपावेतो मी किंवा माझे वडीलांनी त्यांचे हयातीत आव्हानित केलेली नाही. हे म्हणणे खरे आहे की, माझ्या आईने केवळ माझ्या एकट्याच्या नावाची

नोंद दावा मिळकतीच्या महसुल अभिलेखात होण्यासाठी अर्ज केला होता. हे मला माहिती नाही की, आईने तिच्या नावाची नोंद होण्यासाठी अर्ज केला होता किंवा नाही. हे म्हणणे खरे नाही की, बापु सारंग याने फेरफार क्र.१०३८ ला हरकत घेतली होती. साक्षीदार स्वतःहून सांगतो की, बापू याने सदर फेरफार नोंदीस नंतर हरकत घेतली होती. हे म्हणणे खरे नाही की, बापू यांनी हरकत घेतलेली असताना महसुल अधिकारी यांनी बेकायदेशीरपणे सदर फेर मंजूर केला होता. हे म्हणणे खरे आहे की, सदर फेरफार अपिल मध्ये कोकण आयुक्त यांनी रद्द केला होता. हे म्हणणे खरे आहे की, सदर फेर रद्द झाल्याने दावा मिळकतीच्या महसुल अभिलेखातून माझे नाव कमी करण्यात आले होते.

१३. हे म्हणणे खरे आहे की, मयत प्रतिवादी बापू हे बीपीटी मध्ये नोकरीस होते. हे म्हणणे खरे नाही की, सन १९४३ यावर्षी नोकरीस लागले होते. हे म्हणणे खरे नाही की, वडिलांनी दुसरे लग्न केले म्हणून बापू व माझ्या आईचे पटत नव्हते म्हणून बापू त्यांच्यापासून वेगळा राहत होता. हे म्हणणे खरे नाही की, काही वर्षे बापू मामाच्या घरी राहत होता. हे म्हणणे खरे नाही की, दावा मिळकती या बापूने नोकरीच्या पैशातून व मामाने दिलेल्या पैशातून खरेदी केल्या होत्या. हे म्हणणे खरे नाही की, दावा मिळकत कुटूंबासाठी बापूच्या नावाने खरेदी केल्याचे व तेव्हापासून घारु यांच्या सर्व वारसांचा दावा मिळकतीवर कब्जा असल्याचे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, खरेदीखताशी घारु यांच्या इतर वारसांचा कोणताही संबंध नव्हता. हे मला माहिती नाही

की, वडिलांनी त्यांच्या हयातीत नि.क्र.५३ वरील खरेदीखताबाबत हरकत घेतली होती किंवा नाही. हे म्हणणे खरे आहे की, घारु यांनी त्यांच्या हयातीत त्यांच्या किंवा माझ्या नावाची नोंद दावा मिळकतीच्या महसुल दप्तरी होण्यासाठी अर्ज केले नव्हते. हे म्हणणे खरे नाही की, घारु यांनी बापू याला कधीही आर्थिक मदत केली नव्हती. हे म्हणणे खरे नाही की, वडिल कोठेही नोकरीला नव्हते.

१४. हे म्हणणे खरे आहे की, दावा मिळकतीमध्ये बापू यांनी स्वखर्चाने विहीरीचे खोदकाम केले व सदर विहीरीच्या पाण्यातून फळझाडांची लागवड केली आहे. हे म्हणणे खरे नाही की, मला व माझ्या आईला दावा मिळकतीचा हव्यास झाल्याने आईने माझ्या नावाची नोंद होण्यासाठी अर्ज केला होता व सदर हव्यासापोटी मी प्रस्तूतचा खोटा दावा दाखल केला आहे.

१५. हे म्हणणे खरे नाही की, दावा मिळकतीमध्ये माझे वडिल कुळ होते हे दाखवण्यासाठी माझ्याकडे कोणताही पुरावा नाही. हे मला माहिती नाही की, वडिलांनी ते कुळ आहेत असा ठराव मिळण्यासाठी अर्ज केला होता किंवा नाही व त्यांना कुळ ठरवण्यात आले होते किंवा नाही. हे मला माहिती नाही की, घारु यांच्याकडे मुळ मालकाने जमिनी कुळ म्हणून वहिवाटीला दिल्या होत्या हे दाखवण्यासाठी माझ्याकडे

पुरावा आहे किंवा नाही. हे म्हणणे खरे नाही की, दावा मिळकती घारु यांच्याकडे कुळाने होत्या हे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, सन १९४५ मध्ये बापू कोठेही नोकरीस नव्हते व गावी शेती करत होते हे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, बापू व्यतिरीक्त मी दाव्यात नमुद केलेल्या वंशावळीतील इतर कोणाचाही दावा मिळकतीशी संबंध नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी प्रतिवादीकडून मिळकत मिळावी म्हणून प्रस्तूतचा खोटा दावा दाखल केला आहे.

१६. हे मला सांगता येणार नाही की, रे.मु.नं.१९/१९५९ या दाव्यात बापुने दावा मिळकत त्याच्या एकट्याच्या मालकीची आहे व त्याच्या वहिवाटीस कोणीही हरकत करु नये असा दावा दाखल केला होता किंवा नाही. हे म्हणणे खरे नाही की, सन १९५९ सालामध्ये देखील दावा मिळकती बापू याच्या एकट्याच्या मालकीचे असल्याचे मला माहिती होते. हे म्हणणे खरे नाही की, मी बॉम्बे पोर्ट यांचेकडील जा.क्र.इ/१–४०/३२१८ हजर केलेला दस्त खोटा आहे. हे म्हणणे खरे नाही की, दि.३१/०८/१९४४ मध्ये वडील हे सेवानिवृत्त झाले त्याबाबतचा मेमो खोटा दाखल केला आहे. हे म्हणणे खरे नाही की, वडिलांच्या सेवानिवृत्तीनंतर त्यांना निवृत्तीवेतन व त्यांच्या निधनानंतर आईला निवृत्तीवेतन मिळत होते व सदर वेतन पोस्टाने व त्यानंतर बँक खात्यात जमा होत होते हे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, पोस्टाचे व बँकेचे खोटे कागदपत्र हजर केले आहेत.

१७. हे म्हणणे खरे आहे की, घारु सारंग यांना मिळकती घ्यायच्या होत्या तर त्या तयांना त्यांच्या नावे घेणे शक्य होते. हे म्हणणे खरे नाही की, दावा मिळकती बापू यांनी स्वतःच्या पैशातून खरेदी केल्या असल्याने घारु यांचा सदर मिळकतीशी काही संबंध नव्हता. हे म्हणणे खरे नाही की, कुटुंबाच्या पैशातून कुटुंबाकरीता मिळकत खरेदी केल्याचे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, बापू व्यतिरीक्त दावा मिळकतीशी कोणाचा संबंध नसताना मिळकतीचा हिस्सा मिळावा म्हणून खोटा दावा दाखल करुन संपूर्ण खोट्या मजकुराचे प्रतिज्ञापत्र दाखल करुन खोटी साक्ष देत आहे.

उलटतपास पुर्ण.

फेरतपास नाही.

श्रवणोत्तर स्विकृत

Digitally signed by SUNIL BABASAHEB WALKE
Date: 2023.03.02 11:04:48 +1000

दि.०१/०३/२०२३. दिवाणी न्यायाधीश क.स्तर देवगड